## विभागीय आयुक्त कोकण विभाग कोकण भवन नवी मुंबई येथील पुनर्वसन शाखेतील कार्य व कर्तव्ये यांचा तपशिल.

| | | |
|---|---|---|
| कार्यालयाचे नांव | : | विभागीय आयुक्त कोकण विभाग यांचे कार्यालय |
| कार्यालयाचा पत्ता | : | पुनर्वसन शाखा रुम नं.२२८, पहिला मजला<br>कोकण भवन नवी मुंबई ४००६१४ |
| कार्यालय प्रमुख | : | सह आयुक्त (पुनर्वसन) कोकण विभाग |
| शासकीय विभागाचे नांव | : | महसूल व वन विभाग |
| कोणत्या मंत्रालयातील खात्याच्या | : | महसूल व वन विभाग (मदत व पुनर्वसन) |
| आधिनस्त कार्यक्षेत्र | : | कोकण विभागातील पाच जिल्हे -<br>१) ठाणे २) रायगड ३) रत्नागिरी ४) सिंधुदुर्ग ५) पालघर |
| कार्यालयीन दुरध्वनी क्रमांक | : | ०२२/२७५७२६५२. |
| ईमेल | : | rehkonkan१२@gmail.com |

**विशिष्ठ कार्ये :**


१) महाराष्ट्र शासनाचे धोरणानुसार प्रकल्पबाधितांचे पुनर्वसनाचा कार्यक्रम राबविणे.

२) विभागतील सर्व प्रकल्पातील प्रकल्पबाधितांचे पुनर्वसन कामात सहयोग ठेवून देखरेख ठेवणे .

३) विभागीय पातळीवर शासनाकडुन प्राप्त झालेल्या अनुदानाचे जिल्हाधिकारी यांना योग्य वाटप करणे.

४) वित्तीय वार्षिक अर्थसंकल्प विहीत मुदतीत तयार केली जातील याची दक्षता घेणे.

**पुनर्वसन शाखेचा रचनात्मक तक्ता-**



**कामाची कार्यपध्दती-**

- महाराष्ट्र प्रकल्प विस्थापित पुनर्वसन कायदा १९९९ अंतर्गत येणारे प्रस्ताव व संदर्भ सादर करणे.
- नागरी सुविधा अंदाजपत्रकांना मान्यता देणेबाबत कार्यवाही करणे.
- पुनर्वसन आराखड्यास मान्यता देणेबाबत कार्यवाही करणे
- पुनर्वसनाचे विशेष बाब म्हणून जिल्हाधिकारी यांचेकडून प्राप्त झालेले प्रस्ताव शासनास सादर करणे.
- जिल्हाधिकारी यांजकडून प्राप्त झालेले कर्मचारीवृंदांचे मुदतवाढीचे प्रस्ताव शासनास सादर करणे.
- सर्व आहरण व संवितरण अधिकाऱ्यांचा अर्थसंकल्पीय तरतुदीतील मागणीनुसार एकत्रीकृत अहवाल विभागीय आयुक्तांच्या मार्फत शासनास सादर करणे.
- लाभक्षेत्रातील जमिनीकरिता जमिन अधिकृत करण्याकरिता अनुदान मागणीची तपासणी करणे तसेच प्रकल्पग्रस्त व्यक्तींना पर्यायी जमिन वाटप करणे शासनाच्या सूचनेनुसार प्रकल्प बाधित व्यक्तीकडून अनामत स्विकारणे आणि जमिनीचा ताबा घेतल्यानंतर त्याबाबतची रक्कम स्विकारणे या बाबींवर नियंत्रण व तपासणी करणे.
- आहरण व वितरण अधिकाऱ्यांना अनुदान वाटप करणे आणि प्रकल्पबाधित व्यक्तींना दिलेल्या घर कर्जाच्या वसुलीचे उद्दिष्ट ठरविणे.
- खर्चाच्या प्रगतीवर अहवाल घेणे व लेखाशिर्षनिहाय दरमहा एकत्रीकृत खर्चाचा अहवाल सादर करणे.
- चारमाही/ आठमाही/ नऊमाही सुधारीत अंदाजपत्रके तयार करुन समर्पित रकमेचा अहवाल सादर करणे.
- जिल्हानिहाय खर्च आणि प्राप्तीच्या लेख्यांचा महालेखाकारांच्या कार्यालयाशी ताळमेळ घालणे.
- शिल्लकी अनुदानाचे समायोजन लेखाशिर्षनिहाय तयार करणे.
- जिल्हा पुनर्वसन अधिकारी कार्यालयाची लेखाविषयक कागदपत्रांची तपासणी करुन त्यात आढळुन आलेल्या अनियमितता विभागीय आयुक्तांच्या निदर्शनास आणून शासनास अहवाल सादर करणे.